**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.७.१०.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपील-कर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६२८ / सोलापूर | श्री. विठ्ठल पांडुरंग शिंदे घर नं. ३२, वैष्णवी नगर, विजापूर रोड, सोलापूर | उप कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, सोलापूर | प्रभारी कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, सोलापूर | हुद्दा निहाय एम.बी. किती रकमेपर्यंत लिहिता येते, अधिकार शासन निर्णय, जानेवारी २००७ पर्यंत कार्यरत अभियंता, अनुरेखक नावे, मोजणी पुस्तक लिहिण्याची पात्रता नसताना केलेले मूल्यांकन योग्य ठरते काय? शाखा अभियंता यांचे अंतर्गत प्रभाग बदलीचे अधिकार उप अभियंता यांना आहेत काय ? इत्यादी माहिती | अपीलकर्त्याने दि. ७.१०.२००८ रोजी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त माहिती मिळाल्याचे नमूद केले |
| २ | ७३५ / सोलापूर | श्री. सुभाष सरदेशमुख १०१३, नाथ चौक, पंढरपूर, ता. पंढरपूर, जि.सोलापूर | कार्यकारी अभियंता, नीरा उजवा कालवा विभाग, फलटण, जि. सातारा | अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे | दि. १२.१०.२००६ रोजी पंढरपूर येथील अनवली कालवा फुटून वाहिलेल्या पाण्याने शेजारील शेतकरी श्री. रामदास डोंगरे यांचे झालेले नुकसान व अन्य बाबी विषयक माहिती | नुकसान भरपाई मिळण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. मात्र तीनही घटकांमधील चर्चेत अपील निकाली काढण्याची विनंती अपीलकर्त्याने केली. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ७३८ / सोलापूर | श्री. हणमंत नागनाथ खांडेकर मु.पो.गोटेवाडी, ता. मोहोळ, जि.सोलापूर | उप कार्यकारी अभियंता, उपविभाग, मोहोळ, ता.मोहोळ, जि. सोलापूर | कार्यकारी अभियंता, उपविभाग, मोहोळ, ता.मोहोळ, जि. सोलापूर | मोहोळ वैराग मधून जोडरस्ता, मलिकपेठ यावलीकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम किती टक्के झाले, किती शिल्लक, मंजूर रक्कम, अदा रक्कम, कोणा-मार्फत केली, कामगाराचे व्हाऊचर, पगारपत्रक, रोलर नंबर इत्यादी माहिती | वरील तीनही घटकांमधील चर्चेत एकमत झाले. समाधानकारक माहिती मिळाली असल्याचे अपीलकर्त्याने लेखी नमूद केले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील तक्त्यातील अ.क्र. १ ते ३ ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. १८.११.२००८

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ११-११-२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्र. | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपीलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६८८/ सांगली | श्री.डी.एस.पाटील व्दारा सुनिल कदम, दिंडीवेस , आयडीएल स्कूलजवळ, मिरज ४१६ ४१० | गाव कामगार तलाठी गाव चावडी, सलगरे, ता.मिरज जिल्हा सांगली | मंडळ अधिकारी सजा मालगांव, व्दारा तहसील कार्यालय, मिरज, जिल्हा सांगली | सलगरे ग्रामपंचायत हद्दीतील सांभारे पाझर तलाव चावडी बाबत १२ मुद्दयांची माहिती | प्राप्त माहितीने समाधान झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | ६५४/ सांगली | सौ सुप्रिया उमेश मुळे १५५४ गणेशनगर, रोड नं २ , सांगली | चिटणीस ,जिल्हाधिकारी कार्यालय ,सांगली, जिल्हा सांगली | जिल्हाधिकारी सांगली, जिल्हा सांगली | जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांच्या आस्थापनेवरील लिपिक-कलेखकाची पदे भरताना ज्या शासन निर्णयाव्दारे मुलाखत इतर मागास प्रवर्गातून न घेता खुल्या प्रवर्गातून घेण्यात आली त्या शासन निर्णयाची प्रत | माहिती प्राप्त झाल्याने कोणतीही तक्रार राहिली नाही, असे अपीलकर्तीने दि.१०/११/०८ च्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |
| ३ | ६४९/ सांगली | श्री.हरुण रशिद इसूबसो इनामदार, शनिवार पेठ, बागवान गल्ली बाराइमाम दर्गा जवळ, मिरज, जिल्हा सांगली | निवासी नायब तहसीलदार, मिरज | तहसीलदार, मिरज, जिल्हा सांगली | मिरज येथील सि.स.नं.३६३० येथील बेकायदेशीर बांधकामाबाबत व मंडल अधिकारी, मिरज यांनी केलेल्या चौकशीबाबत माहिती | माहिती प्राप्त झाल्याने कोणतीही तक्रार राहिली नाही, असे अपीलकर्त्याने दि.१०/११/०८ च्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ६३५/ सांगली | सौ सुरेखा संजय नरदे गुलमोहोर कॉलनी, माळी चित्रमंदिरजवळ , जिल्हा सांगली | परिक्षा नियंत्रक, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे ७ | कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे ७ | एमए-IIअर्धमागधी (प्राकृत) बहिस्थ परिक्षा व निकाल कामकाजाबाबत माहिती. | आवश्यक माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | ६२३/ सांगली | श्री.विलास परशुराम राजमाने औषध निर्माता , प्रा.आ.केंद्र, शिरशी | जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद , सांगली | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली | डॉ. आर.ए.शिंदे, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, नेर्ले यांची माहे फेब्रु.२००६ ची दैनंदिनी व त्या महिन्याच्या भत्ते बिलाची प्रत | प्राप्त माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

वरील सर्व अपिले (क्र.१ ते ५ ) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. २०-११-२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौसिल
हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शहाजी रामचंद्र मोरे
मु.पो.ता पलूस ,
जिल्हा सांगली ४१६ ३१० — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा तहसिलदार
तहसिलदार कार्यालय पलूस,
जिल्हा सांगली — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा नायब
तहसिलदार , तहसिलदार कार्यालय, पलूस
जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७०४ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. - |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५/१/२००८ |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १/०२/२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४/३/२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१/३/२००८ |
| ७ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | रस्ता मिळणे करिता ग्रामपंचायत पलूस कडे केलेला दि. २२.८.२००३ रोजीचा अर्ज व तहसीदार पलूस यांचा अहवाल अशा मोघम स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री शहाजी रामचंद्र भोरे यांनी पलूस ग्रामपंचायत यांच्याकडे रस्ता मिळण्याकरिता दि. २२.८.२००३ रोजीचा केलेला अर्ज व तहसीलदार , पलूस यांचा अहवाल अशा मोघम स्वरुपाची माहिती मागितली होती.

प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. सदर अपिलाची छाननी केली असता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती दिलेली आहे. रस्त्याची मागणी हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा कक्षेत येत नाही. तसेच आयोगाकडे विहित मुदतीत अपील दाखल केलेले नाही.

## आदेश

आपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
दि.१४.११.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे घविशेष अपील निर्गत कार्यक्रमङ दि.७.१०.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपील कर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७३० / सोलापूर | श्री. हनुमंत पोपट माने मु. पो. ता. करमाळा, जि. सोलापूर | चेअरमन, दि करमाळा अर्बन को-ऑप बँक लि., करमाळा, जि.सोलापूर | जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, सोलापूर | दि. २८.८.२००४ च्या मिटींगद्वारे घेतलेल्या नोंदीची ठराव नक्कल, दि.२७. ११.२००५ ठराव नं.७, दि.२३.५.२००६ ठराव नं.५, दि.२६. ७.२००६ ठराव नं.१०, ठराव नकला व त्यांनी केलेल्या दि. १७.७. २००६ व दि. २४.७. २००६ च्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती | अपीलकर्त्यास माहिती १५ दिवसात देण्याबाबत वरील तीनही घटकांमधील चर्चेत एकमत झाले. |
| २ | ७५० / सोलापूर | श्री. रामराव शामराव काशिद महात्मा गांधी विद्यालय कळवण ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर | चेअरमन, सोलापूर जिल्हा माध्य-मिक शिक्षण व सेवक सहकारी पतसंस्था मर्या., बाळे, ता.उ.सोलापूर जि.सोलापूर | जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, सोलापूर | पतसंस्थेच्या जागा खरेदीच्या दस्ताची झेरॉक्स, सन २००५.०६ व २००६.०७ सालची ऑडीट रिपोर्ट छायांकित प्रत | अपीलकर्ता यांना दि.६.१०.२००८ रोजी माहिती मिळाली असल्याने तक्रार राहिलेली नसल्याचे निवेदन 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' दिवशी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगास सादर केले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ७५१ / सोलापूर | श्री. मधुकर भगवान गुंड महात्मा गांधी विद्यालय कळवण, ता.उत्तर सोलापूर, जि. सोलापूर | चेअरमन, सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षण व सेवक सहकारी पतसंस्था मर्या.बाळे, ता.उ.सोलापूर जि.सोलापूर | जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, सोलापूर | पतसंस्थेच्या जागा खरेदीच्या दस्ताची झेरॉक्स,दि. ५ ऑगस्ट २००७ रोजीचे सर्व-साधारण सभा प्रोसीडिंग नक्कल इत्यादी प्रती | अपीलकर्ता यांना दि. ६.१०.२००८ रोजी माहिती मिळाली असल्याने तक्रार राहिलेली नसल्याचे निवेदन 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' दिवशी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगास सादर केले. |
| ४ | ८०५ / सोलापूर | श्री. अशोक साहेबराव देशमुख मु.पो.ढोराळे, ता. बार्शी, जि. सोलापूर | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सोलापूर | जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, सोलापूर | ढोराळे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., ढोराळे या संस्थेचे सन २००५.०६ चे ऑडिट अहवाल प्रत व कर्जदार थकीत यादी इत्यादी | अपीलकर्त्याने शुल्क भरले नसल्याने माहिती दिली नसल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. माहिती तयार असून शुल्क भरताच माहिती देण्याची तयारी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यातील अ.क्र. १ ते ४ ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र. ८०५ मधील अपीलकर्ता श्री. अशोक साहेबराव देशमुख यांनी शुल्क भरून जन माहिती अधिकाऱ्यांकडून माहिती प्राप्त करून घ्यावी.

३. याबाबतचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकारी यांनी विशिष्ट मुदतीत आयोगास सादर करावा.

पुणे
दि. १० .११.२००८

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २७.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७८५ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. लक्ष्मण तानका देवरे<br>अध्यक्ष, महात्मा ज्योतिबा फुले सेवा मंडळ,<br>८५, नवी पेठ, आदर्श आर्ट टेलरींग इन्स्टिट्यूट,<br>जळगांव - ४२५ ००१ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | प्रशासन अधिकारी, शिक्षण संचलनालय,<br>(माध्यमिक व उच्च माध्यमिक), मध्यवर्ती इमारत,<br>पुणे-४११ ००१ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षण सहसंचालक, (प्रशासन, अंदाज व<br>नियोजन), मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१ | हजर |

अपीलकर्ता श्री. लक्ष्मण तानका देवरे यांनी जन माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ यांचेकडे दि.२.१.२००७ रोजीचे अर्जान्वये दि.६.१०.१९९३ ते दि.३१.१२.२००६ या कालावधीत शासकीय मुद्रणालयाकडे किंवा शासकीय डेपोकडे महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या किती फोटोंची मागणी केली होती व किती ठिकाणी फोटो लावले नाहीत, याची पूर्ण माहिती मागितली होती.

राज्यातील सर्व खाजगी अनुदानित, कायम अनुदानित, तसेच विनाअनुदानित शाळांमध्ये महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांचे फोटो लावण्यात आलेले आहेत, असे जन माहिती अधिकारी यांनी दि. २६.६.२००८ रोजीचे निवेदनात नमूद केले आहे. मात्र आकडेवारी उपलब्ध नाही. आकडेवारी हा मागणीचा विस्तृत भाग असल्याचे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २९.११.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रवीण लक्ष्मण रोकडे
फ्लॅट नं.११, देवेंद्र अपार्टमेंट, शासकीय वसाहत,
विश्रामबाग, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
डॉ.आंबेडकर रोड, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहा.आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
डॉ.आंबेडकर रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८३ / सांगली / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रवीण लक्ष्मण रोकडे
फ्लॅट नं.११, देवेंद्र अपार्टमेंट, शासकीय वसाहत,
विश्रामबाग, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
डॉ.आंबेडकर रोड, पुणे श्री.राम इथापे

जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
डॉ.आंबेडकर रोड, पुणे श्री.सुनिल मगर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.१.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>चि.रजत प्रविण रोकडे याच्या माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा २००६ च्या गणित विषयाच्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत. | |

## विवेचन

आपल्या मुलाच्या माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षेतील (सन २००६) गणित विषयाच्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत अपीलकर्ता श्री.प्रवीण लक्ष्मण रोकडे यांनी जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्याकडे मागितली होती. तपासलेल्या उत्तरपत्रिका या गोपनीय असल्याचे व त्याच्या सत्यप्रती अथवा छायांकित प्रती देऊ नयेत, असा निर्णय महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या सक्षम समितीने घेतला असल्यामुळे ही माहिती देता येत नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी कळविले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनीही तो निर्णय ग्राह्य ठरविला. त्याविरुध्द श्री.रोकडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

शिष्यवृत्ती परीक्षेपूर्वीच्या व नंतरच्याही सर्व परीक्षांमध्ये आपल्या मुलाला गणितात चांगले गुण होते, परंतु शिष्यवृत्ती परीक्षेत त्याला कमी गुण मिळाल्यामुळे गुणी विद्यार्थ्यावर अन्याय होतो. तसेच

विद्यार्थ्याचे खच्चीकरण होते, म्हणून वस्तुस्थितीची पडताळणी करण्यासाठी आपल्याला उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत मिळाली पाहिजे, असे प्रतिपादन श्री.रोकडे यांनी केले. चि.रजत रोकडे याला पहिली ते नववीपर्यंत परीक्षांमध्ये गणितात ८१ ते ९३.५० टक्क्यांपर्यंत गुण मिळत आले आहेत. सन २००३ मधील पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षेत त्याला गणितात १०० पैकी १०० गुण मिळाले, असे श्री.रोकडे यांनी सांगितले. मात्र श्री.रोकडे यांच्या मुलाच्या गुणपडताळणीसाठी अर्ज आला होता, तशी पडताळणी करुन गुणात बदल नसल्याचे त्यांना कळविण्यात आले होते. या संदर्भात दोन वेळा सुनावणी ठेवण्यात आली होती. त्यावेळी, तसेच राज्य माहिती आयोगाने दि.१४.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तही श्री.रोकडे उपस्थित राहिले नाहीत, ते उपस्थित राहिले असते, तर उत्तरपत्रिका तपासणीबाबतच्या प्रक्रियेचा तपशील त्यांना समजावून सांगता आला असता, असे जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे श्री.सुनिल मगर व अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे श्री.राम इथापे यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. 'परीक्षा परिषदेने निश्चित केलेल्या संगणक संस्थेकडून प्रथमतः उत्तरपत्रिकेची डाटा एन्ट्री केली जाते. डाटा एन्ट्री पूर्ण झाल्यावर प्रत्येक विषयाची आदर्श उत्तरसूची संगणक संस्थेस देऊन या उत्तरसूचीनुसार निकाल जाहीर करण्यापूर्वी संगणक तज्ञाकडून तपासणी करण्यात येऊन, तसेच परीक्षा परिषदेकडील अधिकारी / कर्मचारी यांच्याकडून निकालाची तपासणी केली जाते. त्यानंतर निकाल जाहीर केला जातो. निकाल जाहीर केल्यावर गुणपडताळणीसाठी विहित मुदतीत अर्ज मागविण्यात येतात. विहित मुदतीत व विहित फीसह प्राप्त झालेल्या गुणपडताळणीच्या अर्जाप्रमाणे मागणी केलेल्या विषयाची उत्तरपत्रिका काढून त्याची पुनश्च डाटा एन्ट्री करुन व त्या त्या विषयाच्या आदर्श उत्तरसूचीप्रमाणे गुण दिलेले आहेत याची खात्री करुनच गुणपडताळणीचा निकाल संबंधित विद्यार्थ्यास कळविण्यात येतो,' असे श्री.इथापे यांनी दि.३०.११.२००७ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे. त्याचाच त्यांनी सुनावणीतही पुनरुच्चार केला. सर्वोच्च न्यायालयाने, तसेच केंद्रीय माहिती आयोगासह विविध आयोगांनी उत्तरपत्रिकेच्या प्रती न देण्याबाबत दिलेले निर्णयही त्यांनी

उद्धृत केले. पूर्व माध्यमिक व माध्यमिक शालेय शिष्यवृत्ती परीक्षेला सन २००६ मध्ये सुमारे २१ लाख ४८ हजार विद्यार्थी बसले होते. दरवर्षी सरासरी २२ लाख विद्यार्थी या परीक्षेला बसतात. परीक्षा परिषदेकडून या व्यतिरिक्तही अनेक परीक्षा घेतल्या जातात. विद्यार्थ्यांची संख्या प्रचंड असूनही कर्मचारीवर्ग अपुरा आहे. या परीक्षा मानधनावर व रोजंदारीवर कर्मचारी नेमून घेण्यात येतात. नियमित कर्मचारी नियुक्तीसाठी शासनाचे आदेश प्रतीक्षाधीन आहेत, असे श्री.इथापे यांनी लेखी व तोंडी तपशीलवार नमूद केले. या स्थितीत उत्तरपत्रिकांच्या प्रती पुरविणे व्यावहारिकदृष्ट्याही शक्य नसल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. पारदर्शकतेच्या दृष्टीने आयोगाच्या प्रतिनिधीला संबंधित उत्तरपत्रिका दाखविण्याची तयारीही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दर्शविली.

सन २००६ मध्ये गुणपडताळणीसाठी किती विद्यार्थ्यांनी अर्ज केले व त्याबाबत निर्णय काय झाला, याची आयोगाने विचारणा केली असता, एकूण ११०१ विद्यार्थ्यांनी अर्ज केले. त्यातील ६० विद्यार्थ्यांच्या गुणामध्ये फेरबदल असल्याचे कळविण्यात आले व १०४१ अर्ज अवैध ठरले, अशी माहिती परीक्षा परिषदेतर्फे देण्यात आली. परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असली, तरी गुणपडताळणीसाठी येणाऱ्या अर्जांचे प्रमाण त्या तुलनेत अल्प आहे, हे यावरुन स्पष्ट होते.

एक पालक म्हणून श्री.रोकडे यांची तळमळ समजण्यासारखी व रास्त असली तरी संबंधित परीक्षेचा व्याप व न्यायालयासह आयोगांचा निर्णय लक्षात घेता उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत न देण्याचा जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय योग्य आहे. मात्र संबंधित विद्यार्थ्याचे गणित विषयातील आतापर्यंतचे गुण लक्षात घेता याबाबतच्या शंकेचे निरसन होणेही आवश्यक आहे. कारण हा विषय एकूण विद्यार्थ्यांशी संबंधित असला तरी त्याचे स्वरुप प्रातिनिधिक ठरते. या पार्श्वभूमीवर पारदर्शकतेच्या दृष्टीने अपवादात्मक भाग म्हणून व चाचणी स्वरुपात उत्तरपत्रिकेचे अवलोकन करणे उपयुक्त ठरेल, अशा निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. मात्र असे अवलोकन हा अपवाद असेल, सर्वसाधारण नियम म्हणून अंमलात आणता येणार नाही, वा त्याचा दाखला देता येणार नाही.

# आदेश

(१) अपील अमान्य.

(२) विद्यार्थ्यांचे खच्चीकरण होऊ नये, यासाठी शिष्यवृत्ती परीक्षा पध्दतीतील पारदर्शकतेच्या दृष्टीने संबंधित उत्तरपत्रिका पाहण्यासाठी राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ येथील उपसचिव श्री.रा.म.गेंगजे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अवलोकनासाठी संबंधित उत्तरपत्रिका परिषदेच्या कार्यालयात उपलब्ध करुन द्यावी. अपीलकर्ता श्री.प्रविण लक्ष्मण रोकडे यांच्या समवेत संबंधित उत्तरपत्रिकेचे अवलोकन करुन श्री.गेंगजे यांनी दि.२०.१२.२००८ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२९.११.२००८**

प्रत::श्री.रा.म.गेंगजे,उपसचिव, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.चंद्रकांत गणपत अहिनवे
मु.अहिनवेवाडी, पो.ओतूर, ता.जुन्नर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
जुन्नर, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन, ओतूर, जि.पुणे — उत्तरवादी

| | |
|---|---|
| १ अपील क्रमांक | ८४० / अपील / पुणे |
| २ सुनावणीची तारीख | दि.२१.५.२००८ |

३ उपस्थित

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
जुन्नर, जि.पुणे श्री.सुभाष त.औसे

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन, ओतूर, जि.पुणे श्री.सुरेश देवराव धुमाळ

| | |
|---|---|
| ४ जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.८.४.२००६ |
| ५ जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ प्रथम अपिलाची तारीख | दि.९.५.२००६ |
| ७ अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

माझी पत्नी सौ.जिजाबाई चं.अहिनवे हिने पोलीस स्टेशन ओतूरला दिलेल्या दोन तक्रारींच्या प्रती व त्या संबंधातील कागदपत्र.

## विवेचन

आपल्या पत्नीने आपल्या विरुध्द पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीसंदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री.चंद्रकांत गणपत अहिनवे यांनी मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, ओतूर, ता.जुन्नर, जि.पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, जुन्नर, जि.पुणे यांच्याकडून माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.अहिनवे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.अहिनवे याच्या पत्नीने त्यांच्याविरुध्द तक्रारी अर्ज दिले आहेत. तसेच श्री.अहिनवे यांनी अन्य व्यक्तींच्या विरुध्द केलेल्या फिर्यादीमुळे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास अद्याप चालू आहे, असे सहा.पोलिस निरीक्षक, ओतूर पोलीस ठाणे, जि.पुणे श्री.सुभाष औसे यांनी दि.१९.३.२००८ रोजी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या अनुषंगाने आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे. संबंधित कागदपत्रांच्या छायांकित प्रती त्या सोबत त्यांनी जोडल्या आहेत. मात्र आपल्याला ही माहिती मिळालेली नाही, असे प्रतिपादन श्री.अहिनवे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'प्रमाणेच राज्य माहिती आयोगापुढे सुनावणीच्या अनुषंगाने सादर केलेल्या निवेदनातही केले आहे.

संबंधित विषयाचे स्वरुप व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता माहिती देण्यात आली आहे, मात्र पती-पत्नीमधील वादाचा विषय आहे, तसेच श्री.अहिनवे यांनी दाखल केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने आरोपींना अटक करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे, असे सहा.पोलिस निरीक्षक श्री.औसे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.२९.११.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रसाद जवाहर शहा
गाळा नं.५, महालक्ष्मी कॉम्प्लेक्स, पुष्पराज चौक,
सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या मागे, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सह निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८८+८९ / सांगली / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.११.२००८ |

३. उपस्थित

**पलीय प्राधिकारी** तथा विभागीय सह निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.बी.जी.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सांगली प्रतिनिधी श्री.बी.जी पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२९.१२.२००६ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>महाराष्ट्र सहकारी कायद्याचे तरतुदीनुसार अजिंक्य नागरी सहकारी पतसंस्था, सांगली व दिनानाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सांगली या संस्था सुरु झाल्यापासून आजपर्यंतची संचालकांच्या खाजगी स्थावर व जंगम मिळकतीची व इतर बाबींची मागील १० वर्षाची माहिती. |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता श्री.प्रसाद जवाहर शहा यांनी अजिंक्य नागरी सहकारी पतसंस्थेकडील व दिनानाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सांगली यांच्याकडील ठेवींच्या अनुषंगाने संचालकांच्या खाजगी स्थावर व जंगम मिळकतीसह विविध स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली यांच्याकडे मागितली होती. आपल्या कक्षेतील ही माहिती नसल्याच्या कारणावरुन ती देता येत नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय ग्राह्य ठरवून अपील निकाली काढले. त्याविरुध्द श्री.शहा यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१४.५.२००८ रोजी या अपिलांचा विशेष 'अपील निर्गत कार्यक्रमा'त समावेश करण्यात आला होता. परंतु त्यावेळी तीनही घटकात एकमत न झाल्यामुळे या अपिलाची सुनावणी दि.१२.११.२००८ रोजी घेण्यात आली.

नागरी सहकारी पतसंस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही, असे या संस्थेचे प्रतिपादन असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. तरीही माहिती देण्याबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली यांनी नियंत्रक कार्यालय म्हणून संबंधित संस्थांना कळविले व या संस्थांकडून माहिती घेण्याबाबत

अपीलकर्त्यास कळविले. श्री.शहा यांनी संबंधित संस्थांशी संपर्क साधला नाही व आपल्या कार्यालयाच्या कक्षेतील ही माहिती नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.बी.जी.पाटील यांनी स्पष्ट केले.

श्री.शहा यांचा मुख्य प्रश्न मुदत संपल्यानंतर ठेवींची रक्कम परत न मिळाल्याविषयीचा आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत त्या विषयीच्या कार्यवाहीचा विचार करता येणार नाही. त्यांनी मागितलेली माहिती प्रामुख्याने त्या त्या संस्थांशी संबंधित असून नियंत्रक कार्यालय म्हणून जी माहिती संबंधित संस्थांकडून मिळवून देणे शक्य आहे ती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी देणे आवश्यक आहे.

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती प्राप्त करुन देणे शक्य आहे त्याची पूर्तता १५ दिवसात करुन अहवाल आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२४.११.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

**वाचा : अपील / १९७६ / पुणे / २००७, दि.१९.९.२००८ रोजीचे आदेशामध्ये खालील अंशतः बदल करण्यात येत आहे.**

वरील पत्रासोबतचे आयोगाचे दि.१९.९.२००८ रोजीचे आदेशामध्ये खालील अंशतः बदल करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९७६ / पुणे / २००७ | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.कैलास हनुमंत भोरडे<br>सर्व्हे क्र.४७/२६, पर्वती, अरण्येशवर नगर, पुणे-९ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | १. तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, हवेली, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे -१<br>२. नगर भूमापन अधिकारी क्रमांक-२, तहसीलदार, पुणे शहर कार्यालय आवार, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे-२ | गैरहजर<br>हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे प्रदेश , जिल्हाधिकारी, पुणे कार्यालय आवार, पुणे-१ | हजर |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>मौजे कसबे पुणे, ता.पुणे शहर, जि.पुणे या शहराचा महसूली भूमापनाचा (नगर भूमापन नाही) ग्राम नगाशा (तुकडा क्र.५ व ६ वगळून) तुकडा क्र.१,२,३,४ आणि ७ यांच्या प्रमाणित प्रती. | | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.कैलास हनुमंत भोरडे यांनी मागणी केलेले नकाशे उपलब्ध नाहीत, असे उपस्थित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी निवेदनामध्ये स्पष्ट केलेले आहे. सदरचे

अभिलेख ७/१२ उताऱ्यांचे होते. ते आता (सिटी सर्व्हे झाल्याने) नगर भूमापन क्रमांकानुसार तयार झाल्याचे जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.२, पुणे यांनी दि.२४.६.२००८ रोजीचे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये तोंडी विशद केले.

वरील सर्व बाबी पाहता अभिलेख उपलब्ध न होण्याची कारण स्पष्ट होणे गरजेचे आहे. सदरचे अभिलेख कायम जतन करण्याचे ('अ'वर्गातील)असून त्यातील काही भाग उपलब्ध न होणे ही बाब अत्यंत गंभीर आहे, याची संबंधितांनी (जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी) नोंद घ्यावी.

## आदेश

(१) अपील मान्य.

(२) जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित अभिलेख गहाळ होण्याबाबत महाराष्ट्र अभिलेख कायद्या अंतर्गत चौकशी सुरु करावी व हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत त्याबाबतचा अहवाल आयोगाला सादर करावा. (ही मुदत मूळ आदेशाच्या तारखेनुसारच राहील.)

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२९.११.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि. १९.११.२००८ रोजी पुणे येथे आयोजि करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| अ .क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नाव | अपिलीय प्राधिकारी यांचे नाव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ९९२/ सोलापूर | श्री. नागेश पांडुरंग जोशी ५३३, देशपांडे गल्ली,डॉ. डबीर चौक, सांगोला, जि. सोलापूर | तालुका कृषी अधिकारी, कृषी कार्यालय, सांगोला | उपविभागीय कृषी अधिकारी, पंढरपूर विभाग, पंढरपूर, जि. सोलापूर | सन २००४-२००५ व २००५-२००६ या कालावधीतील शेततळया बाबत एकूण ५ मुद्यांची माहिती. | शेततळयांची माहिती उपलब्ध असून रुपये २०० शुल्क भरून माहिती घेवून जाण्याबाबत जन माहिती अधिका-याने कळविले होते. परंतू अपिलकर्त्याने शुल्क भरले नाही, माहितीसाठीचे शुल्क भरल्यास माहिती देण्यात येईल,असे जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले. |
| २ | १०४२/ सोलापूर | श्री. रामसिंग भिमसिंग रजपूत ३१६, स्वामी विवेकानंद नगर, मजरेवाडी पत संस्थेशेजारी, हद्दवाढ भाग, सोलापूर | सहा. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर | इंडिका कार क एम एच १३ एन ८६८९ या वाहनाच्या हस्तांतरणाबाबत एकून ५ मुद्यांची माहिती. | माहिती प्राप्त झाल्याने तक्रार राहिली नसल्याबददल शपथपत्र अपिलकर्त्याने सादर केले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १०६५/ सोलापूर | श्री. प्रताप काशिनाथ चव्हाण ३१४, उत्तर कसबा, थोरला मंगळवेढा तालीम शेजारी, चौपाडा, जि. सोलापूर | जन माहिती अधिकारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण, सोलापूर | शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, १७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे - १ | मेरी बी हार्डिग अध्यापक विघालय, सोलापूर यांच्या सबंधित एकूण ६ मुद्यांची माहिती. | जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी ७ दिवसांच्या आत माहिती देण्यात येईल असे प्रपत्रात नमूद केले. |
| ४ | ११११/ सोलापूर | श्री. महादेव गणपती लोके थडगी मळा, जुना नाका डाक बंगल्यामागे, हौसिंग सोसायटी, शुभंकर बंगला, मु. पो. ता. अक्कलकोट, जि. सोलापूर | व्यवस्थापक, सोलापूर जिल्हा सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्या., ९० मोरारजी पेठ, सोलापूर | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सेलापूर | माहे मे २००५ ते माहे जून २००५ या कालावधीतील बँकेने बँक हिश्यांची व वैयक्तिक हिश्यांची रक्कम भविष्य निर्वाह निधी कार्यालयात भरणा झालेली नसल्याने ही रक्कम भविष्य निर्वाह निधी कार्यालयात भरण्याबाबत माहिती. | माहिती मिळाल्याने कोणतीही तक्रार नसल्याबाबत अपीलकर्त्याने दि. १९.६.२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले असे अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद करून प्रत सादर केली. |
| ५ | ११६२/ सोलापूर | श्री. कृष्णा श्रीहरी वडणे मु. पो. पांगारे, ता. करमाळा, जि. सोलापूर | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, करमाळा, जि. सोलापूर | तहसीलदार, तहसील कार्यालय करमाळा, जि. सोलापूर | मौजे पांगारे, ता. करमाळा येथील फेरफार नं ७१८ मधील गट नं २०० मध्ये झालेल्या नोंदींच्या अनुषंगाने माहिती. | आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १०८२/ सोलापूर | श्री. डॉ. विलास भगवान पाटील ममता हॉस्पिटल, कुर्डुवाडी रोड, बार्शी. जि. सोलापूर | सचिव, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, जि. सोलापूर | सहायक धर्मादाय आयुक्त, नाथ प्राईड, १ ला मजला, सिव्हिल हॉस्पिटलच्या पूर्वेस, उत्तर सदर बझार, सोलापूर | जगदाळे मामा हॉस्पिटल, बार्शी सबंधात एकूण ८ मुद्दयांची माहिती. | माहिती प्राप्त झाल्याने अपील निकाली काढण्याबाबत दि. १८.११.२००८ रोजी अपिलकर्त्याने आयोगास कळविले. |
| ७ | १०५३/ सोलापूर | श्री. दत्तात्रय एकनाथ खटके मु. पो. पोथरे, ता. करमाळा, जि. सोलापूर | अध्यक्ष/ सचिव, महात्मा फुले समाज सेवा मंडळ, नियोजन नगर, करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर | अध्यक्ष/ सचिव, महात्मा फुले समाज सेवा मंडळ, नियोजन नगर, करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर | माहे जाने १९९४ ते २००५ या कालावधीत सदर संस्थेचे गाव नियोजन व विकास प्रकल्प अंतर्गत कामे चालू होती त्या अनुषंगाने माहिती. | माहिती प्राप्त झाल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि. २६.५.०८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना कळविले. |
| | ९८३/ सोलापूर | श्री.मल्लिकार्जुन शंकर धोत्रे गाढवे पेटोल पंपाजवळ, बोलवाड रोड,मिरज, जि. सांगली | शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर - ४, अक्कलकोट रोड, सोलापूर | शासकिय तंत्रनिकेतन सोलापूर-४, अक्कलकोट रोड सोलापूर | प्रा. खान, श्री. थोरात व श्री. तरंगे यांच्या त्रिसदस्य समितीने दि. २४.१२.२००७ २२.१.२००८ व २८.१.२००८ या कालावधीत केलेल्या तपासणी अहवालाच्या छायांकित प्रती. | अपीलकर्त्यास २० दिवसांत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी/ अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले. |

आयोगाचा आदेश पुढील प्रमाणे :

## आदेश

१. वरील सर्व अपिले (क्र. ९९२, १०४२, १०६५, ११११, ११६५, १०८२, १०५३ व ९८३) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र १०६५, १०८२ व ९८३ मध्ये विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयतांचे एकमत झाले, असे या अपिलांमध्ये प्रपत्रांत नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केलेल्या कालावधींतअपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करून द्यावी. सबंधित मुदतीनंतर एक आठवडयात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास सबंधित अधिकारी नियमानुसार कारवाईस पात्र ठरतील.

पुणे

दि.२९.११.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ